पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काजळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
9601222777
9615222777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १८९। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | गुरूवार ०६/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# सरळ रेल्वे मार्गासाठी महामार्गावर चक्काजाम

## क्रांतीदिनी पुकारला सर्वपक्षीय एल्गार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी आता निर्णायक लढा उभारण्याची वेळ आली असून, ९ ऑगस्ट क्रांतीदिनी सकाळी ९ वाजता पुणे-नाशिक महामार्गावर ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. हे कोणत्याही पक्षाचे किंवा एखाद्या राजकीय नेत्याचे आंदोलन नसून, भावी पिढ्यांच्या हितासाठी उभारलेले जनआंदोलन आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार सत्यजित तांबे यांनी केले.

**'शंभर वर्षांतून एकदाच अशी संधी मिळते'**- आमदार तांबे म्हणाले, रेल्वेसारखे मोठे विकास प्रकल्प शंभर वर्षांतून एकदाच साकार होतात. आज हा प्रकल्प आपल्या भागातून निघून गेला, तर पुढील शंभर-दोनशे वर्षांत अशी रेल्वे पुन्हा या भागात येईल, याची कोणतीही खात्री नाही. किंबहुना, अशी संधी पुन्हा मिळणारही नाही. त्यामुळे हा प्रकल्प आपल्या भागातूनच मार्गी लागला पाहिजे.

पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्गासाठीचा संघर्ष आता अंतिम टप्प्यात पोहोचला असल्याचे सांगताना त्यांनी नमूद केले की, एका बाजूला केंद्रीय मंत्र्यांकडून रेल्वे प्रकल्प रद्द झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र दुसऱ्या बाजूला या भागातील जनतेच्या अपेक्षा अजूनही कायम आहेत. सरकार जनभावनेचा आदर करून नफा-तोट्याचा विचार बाजूला ठेवत व्यवहार्य मार्ग काढेल, अशी आमची अपेक्षा आहे.

(पान ४ वर)





### 'उज्वल भविष्यासाठी एकत्र या' दैनिक युवावार्ताचे आवाहन

संगमनेरकरांसह अकोले, सिन्नर, जुन्नरकरांच्या दोन– तीन पिढ्यांनी या रेल्वे मार्गाचे स्वप्न पाहिले आहे. या स्वप्नपूर्तीसाठी अनेक प्रसंगी संघर्ष झाला आहे. हा संघर्ष अंतिम टप्प्यात आला असताना निर्णय बदलला गेला. त्यामुळे विकासाचे स्वप्न धुळीस मिळाले. हा मार्ग म्हणजे केवळ एक रस्ता नाही तर पुढील अनेक पिढ्यांच्या प्रगतीचे उघडणारे दालन आहे. त्यामुळे या प्रश्नावर कोणतेही मतभेद न ठेवता सर्वांनी एकत्र येऊन हा लढा तीव्र करावा आणि जोपर्यंत हा सरळ रेल्वे मार्ग होत नाही तोपर्यंत ही लढाई चालूच राहीली पाहिजे.

**किसन भाऊ हासे**
संस्थापक, दैनिक युवावार्ता

### हे आंदोलन भावी पिढ्यांसाठी



**जेव्हा जनता एकत्र येते, तेव्हा सरकारला निर्णय घ्यावाच लागतो. त्यामुळे हे आंदोलन कोणत्याही पक्षाच्या बॅनरखाली किंवा कोणत्याही नेत्याच्या नेतृत्वाखाली होणार नाही. सामान्य माणूस म्हणून प्रत्येकाने यात सहभागी व्हावे. हे आंदोलन कुणा एका व्यक्तीचे नसून भावी पिढ्यांच्या विकासासाठी आजची पिढी उभारत असलेले ऐतिहासिक जनआंदोलन आहे.**

**- आ. सत्यजित तांबे**

## अतिक्रमित फुटपाथ पालिकेने केले रिकामे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रस्त्यावरुन चालण्यासाठी नागरीकांना जागा मिळत नसल्याने अनेकांना जीव मुठीत धरून चालावे लागते. काही रस्त्यांवर फुटपाथ असूनही अतिक्रमणामुळे ते दबले गेले. त्यामुळे पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याची दखल घेऊन संगमनेर नगरपरिषदेने पोलीस बंदोबस्तात नाशिक रोडवरील फुटपाथवर अतिक्रमण काढून फुटपाथ रिकामे केले.

रस्ते, वाहतूक आणि अपघात हे सध्या कळीचे मुद्दे बनले आहेत. अनेक रस्त्यांवर व्यवसायीकांच्या अतिक्रमणामुळे रस्ते अरूंद बनले तर चालणाऱ्यांसाठी फुटपाथ बनविण्यात आले मात्र तेथेही या व्यवसायीकांनी ठिकठिकाणी अतिक्रमण केले आहे. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने देखील यावर गंभीर चिंता व्यक्त करत चालण्यासाठी रस्ते मोकळे करण्याचे आदेश दिले होते. शहरातील नाशिक-पुणे महामार्गावर देखील हीच परिस्थिती असल्याने सार्वजनिक बांधकाम व पालिकेने हे अतिक्रमण हटविले.

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
दैनिक युवावार्ता कार्यालय
निवेदन
दिनांक १ ऑगस्ट २०२६ पासून
दैनिक युवावार्ता जाहिरात दरात बदल
खालीलप्रमाणे करण्यात आले असून
जाहिरातदार व जाहिरात प्रतिनिधींनी नोंद घ्यावी.
छोटी जाहिरात साईज - ४x५ से. मी.
५ दिवसांसाठी -५०० रू. , १० दिवसांसाठी - ८०० रू.
नावात बदल जाहिरात
साईज ४X५ से. मी. - २०० रू.
वारस नोटीस , जन्म - मृत्यू जाहिरनामा
साईज - ८X६ से. मी. - ७०० रू.
जाहिरातीसाठी संपर्क - ८२७५४००८१७
E-mail- dailyyuvavarta@gmail.com

# विकास कामांची पाहणी की 'शाही पर्यटन' ?

## अंदाज समितीच्या दौऱ्यावर उधळपट्टीचा आरोप



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्ह्यात ६ ते ८ ऑगस्टदरम्यान महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीचा दौरा होणार असून, या दौऱ्यापूर्वीच शाही पाहुणचाराच्या तयारीवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. विकास कामांचा आढावा घेण्यासाठी येणाऱ्या २७ आमदारांसाठी महागड्या एसी स्टार हॉटेल्समधील सूट, प्रत्येक आमदारासाठी दोन इनोव्हा गाड्या, आवडीनुसार शाही भोजन आणि अन्य आलिशान सुविधांची व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे या खर्चासाठी काही शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अंतर्गत वर्गणी गोळा करण्यात आल्याची चर्चा प्रशासनात रंगली आहे.

अंदाज समितीचे प्रमुख आमदार अर्जुन खोतकर यांच्या नेतृत्वाखाली समिती जिल्ह्यातील विविध विकास कामे, निधीचा वापर आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणार आहे. या समितीच्या सदस्यांना शासनाकडून अधिकृत भत्ताही दिला जातो. मात्र, त्यानंतरही पाहुणचाराचा आर्थिक भार स्थानिक अधिकाऱ्यांवर टाकला जात असल्याचा आरोप होत आहे. अहिल्यानगरमध्ये कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेले व्हीव्हीआयपी शासकीय विश्रामगृह उपलब्ध असतानाही बहुसंख्य आमदारांसाठी लक्झरी हॉटेल्सचे बुकिंग करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. आमदारांसह त्यांच्या स्वीय सहाय्यकांसाठी स्वतंत्र खोल्या, विशेष भोजन आणि अन्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय प्रत्येक आमदाराला त्यांच्या मतदारसंघातून आणण्यासाठी दोन आलिशान इनोव्हा गाड्या पाठविण्याची तयारी करण्यात आली असून, इंधन, चालक, नाश्ता आणि प्रवासाचा संपूर्ण खर्चही संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनाच उचलावा लागणार असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील जलजीवन मिशनमधील कथित कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्यानंतर काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली आहे. अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांवर अद्याप चौकशीची टांगती तलवार असल्याने अंदाज समितीच्या दौऱ्यामुळे प्रशासनातही मोठी धास्ती निर्माण झाली आहे.

अंदाज समितीचे काम म्हणजे जिल्ह्यातील विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करणे, निधीचा योग्य वापर झाला का याची तपासणी करणे आणि शासनाच्या पैशांचा हिशोब घेणे. मग या दौऱ्यासाठी इतका शाही थाटमाट कशासाठी? सरकारी विश्रामगृह असताना महागड्या हॉटेलसची गरज काय? शासनाकडून भत्ता मिळत असतानाही अधिकाऱ्यांवर आर्थिक भार टाकण्याचे कारण काय? जिल्ह्याच्या विकास कामांची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी हा दौरा आहे की शाही पर्यटनासाठी? हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. जर विकासकामांची तपासणीच उद्देश असेल, तर साधेपणाने दौरा करून प्रशासनाला जबाबदार धरणे अधिक योग्य ठरणार नाही का, अशीही भावना व्यक्त होत आहे.

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# मनीषजी मालपाणी - सहप्रवासात अनुभवलेलं





काही माणसांची ओळख केवळ एका नात्याने, एका पदाने किंवा त्यांच्या यशाने पूर्ण होत नाही; तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक पैलू तितकाच सुंदर असतो.

वयाची अवघी अठरा वर्षे पूर्ण झाली होती, तेव्हा मी त्यांच्या आयुष्यात आले. संसार म्हणजे काय, आयुष्य किती वेगवेगळी वळणं घेणार आहे, याची त्या वेळी फारशी कल्पना नव्हती. पण काळ पुढे सरकत गेला आणि त्यांच्यासोबतचा सहप्रवास समृद्ध होत गेला, तसतसं त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक सुंदर पैलू माझ्यासमोर उलगडत गेले. आज आमच्या सहप्रवासाला ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. या प्रवासात मी त्यांना अनेक भूमिकांमध्ये अनुभवले आहे - माझे जीवनसाथी, जिवलग मित्र, माझा खंबीर आधार, प्रेमळ पिता, कुटुंबाला जोडून ठेवणारा माणूस, दूरदृष्टी असलेला उद्योजक, मित्रांचा मित्र, उत्तम मार्गदर्शक आणि मनापासून अध्यात्म जपणारी व्यक्ती. प्रत्येक भूमिकेत त्यांच्या स्वभावातील एक गोष्ट मला कायम जाणवली - ते माणसांवर मनापासून प्रेम करतात, नाती जपतात आणि प्रत्येक जबाबदारी पूर्ण प्रामाणिकपणे निभावतात.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मला भावलेले काही पैलू आणि त्यांच्या सहवासात अनुभवलेल्या काही अविस्मरणीय आठवणी शब्दबद्ध करण्याचा हा माझा छोटासा, पण मनापासून केलेला प्रयत्न आहे.

## दूरदृष्टी असलेला उद्योजक




मनीषजींच्या व्यक्तिमत्त्वातील ज्या पैलूचा मला नेहमीच विशेष अभिमान वाटतो, तो म्हणजे त्यांच्यातील दूरदृष्टी असलेला उद्योजक! आयुष्यात त्यांनी यशाची अनेक शिखरं गाठली; पण माझ्या दृष्टीने त्यांच्या यशाचं खरं मोजमाप केवळ त्यांनी काय उभं केलं यात नाही, तर योग्य वेळी योग्य संधी ओळखण्याची आणि तिचं भविष्यातील महत्त्व अचूकपणे जाणण्याची त्यांची क्षमता, हेच त्यांच्या यशाचं खरं मोजमाप आहे.

मालपाणी समूहाच्या पारंपरिक व्यवसायाचा भक्कम वारसा पुढे नेत असतानाच त्यांनी बदलत्या काळाची चाहूल अचूक ओळखली. समूहासाठी नवनवीन व्यवसाय, नव्या संधी आणि विस्ताराच्या नव्या दिशा शोधण्यात त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीतील एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे निर्णय घेण्याची त्यांची पद्धत. कोणताही निर्णय ते कधीही केवळ उत्साहाच्या भरात किंवा घाईघाईने घेत नाहीत. कोणताही विषय असो, त्याचा सखोल अभ्यास करणं, संबंधित व्यक्तींशी चर्चा करणं, प्रत्येकाचं मत शांतपणे ऐकून घेणं, सर्व बाजू समजून घेणं आणि त्यानंतर स्वतःचा निर्णय घेणं, ही त्यांची कायमची कार्यपद्धती आहे.

त्यांच्या निर्णयांमध्ये धाडस असतं, पण उतावळेपणा नसतो; आत्मविश्वास असतो, पण अहंकार नसतो; आणि महत्त्वाकांक्षा असते, पण तिच्या पायाशी अभ्यास आणि वास्तवाचा भक्कम पाया असतो.

मालपाणी समूहाच्या पारंपरिक तंबाखू व्यवसायाशी त्यांचं नातं अतिशय घट्ट आहे. अनेक वर्षांच्या अनुभवातून आणि सातत्यपूर्ण अभ्यासातून त्यांनी या व्यवसायातील प्रत्येक बारकावा आत्मसात केला आहे. तंबाखूच्या विविध जाती, त्यांची वैशिष्ट्यं, गुणवत्ता आणि उत्पादनासाठी योग्य तंबाखूची निवड याबद्दलचं त्यांचं ज्ञान अत्यंत सखोल आहे. तंबाखू हातात घेतल्याक्षणी त्याची जात, गुणवत्ता आणि उत्पादनात त्याचा कसा उपयोग होऊ शकतो, याचा अचूक अंदाज ते सहजपणे घेतात. कच्च्या मालाच्या निवडीपासून ते अंतिम उत्पादनापर्यंत गुणवत्ता कशी टिकवून ठेवायची, प्रक्रियेत कुठे सुधारणा करता येईल आणि उत्पादन अधिक परिणामकारक कसं करता येईल, याकडे त्यांचं नेहमीच बारकाईने लक्ष असतं.

Factory, Machinery, Production आणि Process यांविषयीचं त्यांचं ज्ञानही तितकंच सखोल आहे. कारखान्यातील एखादं मशीन कसं काम करतं, उत्पादन प्रक्रियेत नेमका अडथळा कुठे निर्माण होतो, वेळ कुठे वाया जातो आणि एखादा छोटासा तांत्रिक बदल संपूर्ण प्रक्रिया किती अधिक सुरळीत आणि कार्यक्षम बनवू शकतो, हे त्यांच्या नजरेतून कधीच सुटत नाही.

अनेकदा Supervisors किंवा Technical Team एखाद्या समस्येवर उपाय शोधत असताना, ते काही क्षणांतच तिचं मूळ कारण ओळखतात आणि अतिशय व्यावहारिक उपाय सुचवतात. व्यवसायाची सखोल समज, तांत्रिक जाण आणि सूक्ष्म निरीक्षण करण्याची त्यांची क्षमता त्यांच्या प्रत्येक निर्णयातून प्रकर्षाने जाणवते.

मालपाणी समूहातील विविध कारखान्यांमधील P l a n t Construction, Factory Development आणि Godown Construction या कामांवरही त्यांचं अत्यंत बारकाईने लक्ष असतं. सांगमनेर आणि नाशिक परिसरातील समूहाच्या विविध प्रकल्पांच्या उभारणीत त्यांनी नियोजन, दर्जा आणि कार्यक्षमतेला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिलं आहे. एखाद्या प्रकल्पाच्या संकल्पनेपासून ते प्रत्यक्ष साकार होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर त्यांचं बारकाईने लक्ष आणि मार्गदर्शन असतं.

त्यांचं तंबाखू व्यवसायाशी असलेलं नातं केवळ कारखान्यापुरतं मर्यादित नाही. या व्यवसायाचा पाया असलेल्या शेतकऱ्यांशीही त्यांनी विश्वासाचं आणि जिव्हाळ्याचं नातं निर्माण केलं आहे. दरवर्षी ते गुजरात, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेशमधील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेतात. त्यांच्या अडचणी समजून घेत, अधिक दर्जेदार उत्पादनासाठी त्यांना मार्गदर्शन करतात. त्यांच्या या आत्मीयतेमुळे शेतकऱ्यांशी अनेक वर्षांचं दृढ आणि विश्वासाचं नातं निर्माण झालं आहे. पारंपरिक व्यवसायाशी घट्ट नातं जपत त्यांनी बदलत्या काळानुसार नव्या क्षेत्रांतील संधीही दूरदृष्टीने ओळखल्या.

विशेषतः मनोरंजन क्षेत्रात मालपाणी समूहाने प्रवेश करण्याचा निर्णय हा त्यांच्या व्यावसायिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. त्या काळात समूहासाठी हे क्षेत्र पूर्णपणे नवीन होतं. त्यामुळे हा निर्णय निश्चितच सोपा नव्हता. त्यामागे भविष्यातील संधी ओळखण्याची दूरदृष्टी आणि नवीन वाट स्वीकारण्याचं धैर्य होतं.




या क्षेत्रात प्रवेश करण्याचा निर्णय घेण्याबरोबरच त्याची भक्कम पायाभरणी करण्यामध्येही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. आज या व्यवसायाची धुरा आमचा सुपुत्र जय समर्थपणे सांभाळत त्याला नव्या उंचीवर घेऊन जात आहे. भारताच्या मनोरंजन क्षेत्रात मालपाणी समूहाने निर्माण केलेलं मानाचं स्थान पाहिलं की, अनेक वर्षांपूर्वी त्यांनी दूरदृष्टीने घेतलेल्या त्या निर्णयाचं महत्त्व अधिक अधोरेखित होतं. Land Development च्या क्षेत्रात त्यांचा हातखंडा आहे. एखादी जमीन पाहिल्यानंतर तिची क्षमता, स्थान, भविष्यातील मूल्य आणि त्या जागेत दडलेल्या शक्यता ते सहज ओळखतात. जमीन घ्यावी की नाही, तिचा भविष्यात कसा विकास होऊ शकतो आणि तिच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहायला हवं, याबाबतची त्यांची व्यावसायिक समज आणि निर्णयक्षमता अनेकदा काळाच्या कसोटीवर अचूक ठरली आहे. त्यांच्यासोबत प्रवास करताना मला नेहमी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते - मनीषजींमधला उद्योजक कधीच सुट्टीवर नसतो.

नवीन शहर असो किंवा नवीन देश, एखादं उत्कृष्ट हॉटेल, Resort, Amusement Park किंवा एखादी वेगळी व्यावसायिक संकल्पना दिसली की, ते केवळ तिचं सौंदर्य पाहून पुढे जात नाहीत. त्या संकल्पनेमागचा विचार, व्यवस्थापनाची पद्धत, ग्राहकांचा अनुभव आणि त्यामागील यशाची कारणमीमांसा समजून घेण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होतो. प्रत्येक गोष्टीकडे ते एका उद्योजकाच्या नजरेतून पाहतात आणि त्यातून शिकण्यासारखं काय आहे, याचा अभ्यास करतात.

## समाजाशी जपलेली बांधिलकी



व्यवसायात यश मिळवणं ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक बाजू आहे; पण त्या यशाला समाजाप्रति असलेल्या बांधिलकीची जोड त्यांनी नेहमीच दिली. म्हणूनच त्यांचं कार्य उद्योगविश्वापुरतं मर्यादित न राहता समाजजीवनाशीही तितक्याच आत्मीयतेने जोडलं गेलं आहे.

गेली बावीस वर्षे राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना त्यांनी अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांना दिशा दिली.

Sangamner Festival हा त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारा एक वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक उपक्रम आहे. दरवर्षी गणेशोत्सवानिमित्त संगमनेरकरांसाठी विविध सांस्कृतिक, क्रीडा आणि मनोरंजन कार्यक्रमांची भव्य मेजवानी या उत्सवाच्या माध्यमातून अनुभवायला मिळते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव वर्षागणिक अधिक समृद्ध आणि व्यापक होत गेला. आज तो केवळ एक उत्सव राहिलेला नाही, तर संगमनेरच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी असलेल्या त्यांच्या गाढ श्रद्धेतून 'जाणता राजा' या विश्वविख्यात महानाट्याचे मंडळाच्या माध्यमातून आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेरमध्ये दोनदा भव्य प्रयोग आयोजित करण्यात आले. हा केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नव्हता, तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यासाठी एक अविस्मरणीय सांस्कृतिक पर्व ठरला. संगमनेर तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक शाळांनी विद्यार्थ्यांसाठी या महानाट्याला शैक्षणिक भेटी आयोजित केल्या. हजारो विद्यार्थी, नागरिक आणि रसिकांच्या उपस्थितीत संपन्न झालेला हा भव्य सोहळा संगमनेरच्या सांस्कृतिक इतिहासातील एक मानाचा अध्याय ठरला.

अखिल भारतीय माहेश्वरी समाजासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या 'विवाहयोग्य युवक-युवती परिचय संमेलन' या उपक्रमाला त्यांच्या मार्गदर्शनाखाली नवं बळ आणि अधिक व्यापक स्वरूप लाभलं. या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना योग्य जीवनसाथी शोधण्यास मोलाची मदत होत आहे. राज्यस्तरीय व्हॉलीबॉल, क्रिकेट, कब्बडी आणि नृत्यस्पर्धांसह ' महाराष्ट्र श्री' यांसारख्या विविध उपक्रमांचं यशस्वी आयोजन त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलं आहे. या प्रत्येक उपक्रमामागे युवकांना स्वतःचं कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळावी, त्यांच्या गुणांना योग्य वाव मिळावा आणि त्यांच्यातील आत्मविश्वास अधिक बळकट व्हावा, हीच त्यांची मनापासूनची तळमळ असते.

त्यांच्या मते, समाजाच्या उज्ज्वल भविष्याची खरी ताकद ही युवकांमध्ये दडलेली असते. योग्य संधी, योग्य दिशा आणि योग्य प्रोत्साहन मिळालं तर ते केवळ स्वतःचं भविष्य घडवत नाहीत, तर समाजाच्या प्रगतीलाही नवी दिशा देतात. म्हणूनच नव्या पिढीला पुढे येण्यासाठी, त्यांच्या गुणांना वाव मिळावा आणि नेतृत्व करण्याची संधी मिळावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. मनीषजी 'वृक्षमित्र' म्हणूनही ओळखले जातात. वृक्षरोपणाचे कार्य त्यांनी अत्यंत मनापासून करतात. आजवर त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून दोन लाखांहून अधिक वृक्षांची लागवड त्यांनी केली आहे. मात्र, त्यांच्यासाठी झाडं लावणं महत्त्वाचं नाही, तर ती निरोगीपणे वाढून मोठी होणं अधिक महत्त्वाचं आहे.

म्हणूनच प्रत्येक रोपट्याच्या संगोपनासाठी आवश्यक ती व्यवस्था केली जाते. लागवडीनंतर दोन ते अडीच वर्षे ठिबक सिंचनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासू नये म्हणून टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठाही केला जातो. झाडं स्वतःच्या बळावर वाढू लागल्यानंतर तीच सिंचन व्यवस्था नव्याने लावलेल्या रोपांसाठी वापरली जाते. त्यांच्यासाठी हे केवळ पर्यावरण संवर्धनाचं काम नाही; तर निसर्गाशी जपलेली एक जिव्हाळ्याची बांधिलकी आहे. प्रत्येक रोप वृक्ष होईपर्यंत त्याच्यासोबत राहण्याची त्यांची ही वृत्तीच या कार्याला वेगळं स्थान मिळवून देते.

## विश्वास जपणारं व्यक्तिमत्त्व

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मला सर्वाधिक भावणारा गुण म्हणजे त्यांचा निःस्वार्थी स्वभाव. मदतीसाठी त्यांच्याकडे आलेला माणूस शक्यतो कधीही रिकाम्या हाताने परत जात नाही. एखाद्याची आर्थिक अडचण असो, वैयक्तिक प्रश्न असो किंवा आयुष्यातील कठीण प्रसंग—समोरच्या व्यक्तीची परिस्थिती समजून घेत, शक्यतो प्रत्येक प्रकारे मदत करण्यास ते नेहमीच तत्पर असतात.

माणसांना समजून घेण्याची त्यांची क्षमता विलक्षण आहे. एखादी व्यक्ती त्यांच्याकडे मन मोकळं करायला आली की, ते केवळ तिचं म्हणणं ऐकत नाहीत, तर तिच्या दृष्टीकोनातून परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करतात.

म्हणूनच त्यांच्या सल्ल्यात अनुभव, संवेदनशीलता आणि व्यावहारिक विचार यांचा सुंदर समतोल दिसून येतो. कोणताही विषय असो, ते घाईघाईने मत व्यक्त करत नाहीत. सर्व बाजूंचा शांतपणे विचार करूनच ते आपलं मत मांडतात. त्यामुळे अनेक कुटुंबांतील मतभेद मिटवणं, दुरावलेल्या नात्यांमध्ये पुन्हा संवाद घडवून आणणं आणि कठीण प्रसंगी योग्य दिशा दाखवणं, अशा अनेक प्रसंगी त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. विशेष म्हणजे, त्यांनी केलेल्या मदतीचा उल्लेख ते कधीच स्वतःहून करत नाहीत. अनेकदा एखादी व्यक्ती सहज भेटून म्हणते, “त्या वेळी मनीषजींनी आम्हाला मोठा आधार दिला होता,” तेव्हाच आम्हाला त्यांच्या अनेक सत्कार्यांची माहिती मिळते. दुसऱ्याच्या आयुष्यात शांतपणे सकारात्मक बदल घडवून आणणं आणि त्याचं श्रेय न घेणं हे त्यांचं वैशिष्ट्य आहे.

## नात्यांची श्रीमंती

त्यांचा मित्रपरिवारही तितकाच मोठा आणि जिव्हाळ्याचा आहे. त्यांच्यासाठी मैत्री ही केवळ ओळख नसून, आयुष्यभर जपायचं नातं आहे. ते माणसांना त्यांच्या गुण-दोषांसह स्वीकारतात, सहजपणे त्यांच्याशी जोडले जातात आणि काळ बदलला तरी नात्यांमधला जिव्हाळा तसाच जपतात.

मित्र, कर्मचारी, व्यावसायिक सहकारी, सामाजिक कार्यकर्ते किंवा समाजातील कोणतीही व्यक्ती - प्रत्येकजण त्यांना आपुलकीने 'भाऊ' अशीच हाक मारतो. हे संबोधन केवळ सवयीचा भाग नसून, त्यांनी जपलेल्या विश्वासाच्या आणि आपलेपणाच्या नात्यांचीच ती एक स्वाभाविक अभिव्यक्ती आहे. मराठी संस्कृतीत 'भाऊ' हा शब्द केवळ एखादं नातं दर्शवत नाही; तो विश्वास, आपुलकी आणि आधार यांचं प्रतीक आहे. मनीषजींनी आपल्या वागण्या - बोलण्यातून आणि आयुष्यभर जपलेल्या नात्यांमधून या शब्दाचा अर्थ खऱ्या अर्थाने सार्थ ठरवला आहे. म्हणूनच अनेकांसाठी ते केवळ एक यशस्वी उद्योजक नाहीत, तर कोणत्याही प्रसंगी विश्वासाने हाक मारावी असे हक्काचे 'भाऊ' आहेत.

## अध्यात्म आणि शिस्त


त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात प्रेरणादायी पैलू म्हणजे त्यांचं अध्यात्माशी असलेलं अतूट नातं. त्यांच्यासाठी अध्यात्म म्हणजे केवळ पूजा, विधी किंवा परंपरा नव्हे; तर जीवनाकडे पाहण्याची एक



शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५


ताजणे मशनिरीचे संचालक
मा. अंकुश ताजणे
यांना
वाढदिवसानिमित्त
मनःपूर्वक शुभेच्छा !
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
YUVA POLYPRINT & PACKAGING INDUSTRIES



# आठवडे बाजारात बिबट्याचा धुमाकूळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील साकूर येथे आठवडे बाजाराच्या दिवशी भर सकाळी बिबट्याने दर्शन देत धूमाकूळ घातल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. बिबट्याच्या अचानक झालेल्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बिबट्याला पाहताच चार ते पाच कुत्रे त्याच्या मागे लागले. कुत्र्यांनी हल्ला चढवल्याने वैतागलेल्या बिबट्याने तेथून पळ काढला. हा संपूर्ण प्रकार काही काळ सुरू असल्याने परिसरात मोठी धावपळ उडाली.

आठवडे बाजारासाठी मोठ्या संख्येने नागरिक साकूरमध्ये येत असल्याने या घटनेने सर्वांमध्ये घबराट पसरली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाल्याची माहिती समोर आलेली नाही. मात्र, वन विभागाने तातडीने परिसराची पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# केमिकलपासून बनावट तूप-पनीर तयार करणाऱ्या डेअरीवर एफडीएचा छापा

छ.संभाजीनगर (वृत्तसंस्था)

छत्रपती संभाजीनगरमध्ये अन्न सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एमआयडीसी चिखलठाणा परिसरातील 'मेसर्स अमोल दूध डेअरी' येथे केमिकल आणि खाण्यासाठी अयोग्य (नॉन-फूड ग्रेड) सोयाबीन तेलाचा वापर करून बनावट तूप, साय, क्रीम आणि पनीर तयार केले जात असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) कारवाईत समोर आले. या कारवाईत सुमारे ३ लाख १२ हजार ३८० रुपयांचा ९५० किलो भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत गुप्त माहितीच्या आधारे एफडीएच्या पथकाने मध्यरात्री अचानक डेअरीवर छापा टाकला. तपासणीदरम्यान डेअरीमध्ये खाण्यासाठी अयोग्य असलेल्या नॉन-फूड ग्रेड सोयाबीन तेलाचे १० ते १२ बॅरल्स आढळून आले. तसेच २९९ किलो सुते तूप, १९९ किलो सुती साय व क्रीम, १७४ किलो पनीर आणि २७८ किलो



रिफाइंड सोयाबीन तेल असा मोठा भेसळयुक्त साठा जप्त करण्यात आला.

तपासात आणखी धक्कादायक बाब समोर आली. ही डेअरी केवळ स्वतःच हा माल विकत नव्हती, तर शहरातील काही नामांकित दुकानांनाही त्याचा पुरवठा करत होती. त्यानुसार एफडीएने लक्ष्मी डेअरीच्या टीव्ही सेंटर, कामगार चौक आणि दर्गा रोडवरील श्रीराम चौक येथील तीन रिटेल काउंटरवरही धडक कारवाई केली. या ठिकाणांहून २९ हजार ९३० रुपये किमतीचे ४१ किलो गाईचे तूप जप्त करण्यात आले असून, सर्व नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

या गंभीर प्रकाराची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने 'मेसर्स अमोल दूध डेअरी'चा अन्न सुरक्षा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित केला असून संपूर्ण उत्पादन युनिट सील करण्यात आले आहे. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर अन्न सुरक्षा कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

यावेळी मराठवाडा विभागाचे हेमंत बरसे, राजेश वाडेकर, अशोक गायकवाड, विजय निकाळजे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

# अ‍ॅड. आर. बी. सोनवणे यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांचे कट्टर समर्थक तथा अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे विश्वस्त, ज्येष्ठ कायदेतज्ञ अ‍ॅड. रामनाथ सोनवणे उर्फ आर.बी. सोनवणे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.



निमगाव भोजापूर येथील रहिवासी असलेले अ‍ॅड.आर.बी.सोनवणे यांनी संगमनेरच्या सहकार आणि राजकीय क्षेत्रात मोठे योगदान दिले. याचबरोबर आपल्या गुणवत्तेतून देशात अग्रनामांकित असलेल्या अमृतवाहिनी शिक्षण संस्थेचे विश्वस्त पद सांभाळले. संगमनेर मधील प्रथितयश कायदे तज्ञ म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. अगदी अल्पशा आजाराने त्यांचे वयाच्या ८२ वर्षी निधन झाले असून त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा मोठा परिवार आहे. अ‍ॅड.आर.बी.सोनवणे यांनी वकिली बरोबर संगमनेरच्या शैक्षणिक सामाजिक आणि सहकार क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. याचबरोबर गाव पातळीवर विविध सहकारी संस्थांमध्येही त्यांनी नेतृत्व दिले. त्यांच्या निधनाने एक ज्येष्ठ सहकारी हरपला असल्याची भावना काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर कायद्याचे व शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू मार्गदर्शक हरपले असल्याचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी म्हटले आहे.

अ‍ॅड. आर. बी. सोनवणे यांच्या निधनाबद्दल मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, अ‍ॅड. माधवराव कानवडे, सौ. दुर्गाताई तांबे, पांडुरंग पा. घुले, रणजीतसिंह देशमुख, इंद्रजीत थोरात, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, शंकरराव खेमनर, संपतराव डोंगरे रामहरी कातोरे, सुनील कडलग, विलास वरपे, आनंद वर्पे, अमृतवाहिनी शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्हि.बी.धुमाळ तसेच सर्व प्राचार्य, विभाग प्रमुख यांनी दुःख व्यक्त केले आहे याचबरोबर अमृत उद्योग समूह, निमगाव भोजापुर ,चिकणी परिसरातील नागरिकांनीही दुःख व्यक्त केले.

# फसव्या लिंक्सपासून सावध रहा: अतुल बोऱ्हाडे



संगमनेर (प्रतिनिधी)

सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर आकर्षक ऑफर्स, मोफत गिफ्ट आणि बक्षिसांचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगार नागरिकांची फसवणूक करत असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते व कर सल्लागार अतुल बोऱ्हाडे यांनी दिला आहे.

व्हॉट्सप, सोशल मीडिया किंवा एसएमएसद्वारे पाठविण्यात येणाऱ्या संशयास्पद लिंक्सवर क्लिक केल्यानंतर -झघ किंवा नखझ फाईल डाउनलोड करण्यास भाग पाडले जाते. अशा फाईल्स इन्स्टॉल झाल्यास मोबाईलवरील माहिती धोक्यात येण्याबरोबरच संपर्क यादीतील इतरांनाही त्याच फसव्या लिंक्स पाठवल्या जाण्याची शक्यता असते. मोबाईल अचानक हँग होणे, गरम होणे, अनोळखी संदेश आपोआप पाठवले जाणे किंवा बँक खात्यात संशयास्पद व्यवहार दिसणे ही सायबर हल्ल्याची संभाव्य लक्षणे असल्याचे बोऱ्हाडे यांनी सांगितले. त्यांनी नागरिकांना अनोळखी लिंक्सवर क्लिक न करण्याचे, ऋेसश्रश झश्रर्रू डीेीश व्यतिरिक्त इतरत्रून प्स डाउनलोड न करण्याचे, ओटीपी, पासवर्ड किंवा बँक खात्याची माहिती कोणाशीही शेअर न करण्याचे तसेच मोबाईल नियमित अपडेट ठेवण्याचे आवाहन केले. एक चुकीची क्लिक तुमची आर्थिक आणि वैयक्तिक माहिती धोक्यात आणू शकते. सतर्क राहा, सुरक्षित राहा आणि इतरांनाही जागरूक करा, असे आवाहन अतुल बोऱ्हाडे यांनी केले.

# ख्रिस्ती समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील - दिपके

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ख्रिस्ती समाजाच्या धर्मांतर कायदेविषयक लढ्यात ख्रिस्ती समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील असे प्रतिपादन कोकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी केले. विद्यार्थ्यांच्या परीक्षा शिक्षणातील त्रुटी संदर्भात कोकरोच जनता पार्टीने केलेले दिल्ली येथील शांततापूर्वक आंदोलन आणि त्याला मिळालेले यश या पार्श्वभूमीवर आखिल भारतीय ख्रिशन फोरमच्या वतीने ऱअभिजित दिपके यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन फोरमच्या वतीने सहसंचालक अनिल भोसले व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.



अभिजित दिपके यांना फोरमच्या वतीने धर्मांतर कायद्याविषयीची माहिती दिली. या विषयाच्या संदर्भात अखिल भारतीय ख्रिशन फोरमच्या लढ्यात आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शांततापूर्वक जगणाऱ्या ख्रिस्ती समाजाच्या लढ्यात देखील आपण सहकार्याचा हात पुढे करून संबंधित कायदा रद्द करण्यासाठी च्या लढ्यात पुढे यावे अशी मागणी करण्यात आली यावेळी दिपके यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

यावेळी मराठवाडा विभागाचे हेमंत बरसे, राजेश वाडेकर, अशोक गायकवाड, विजय निकाळजे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

# आयुष्यभर आई शोधण्याची लढाई करणारे महाकवी नारायण सुर्वे...

मागील भागापासून पुढे - देशातल्या माणसांच्या बुकात, तुझे नाव तरी आले.. त्यांचं हे काव्य म्हणजे व्यवस्थेच्या चिंधड्या करणारं होतं. कारण पद्मश्री मिळाला म्हणून मी या देशाचा माणूस आहे याला मान्यता मिळाली. जर पद्मश्री मिळाला नसता तर सुर्वे यांच्या माणूसपणाचं, जगण्याचं काय झालं असतं? कारण सरकार ही एक अशी विचित्र गोष्ट आहे, जी इतर गोष्टींच्या मागे असते परंतु माणसाच्या मागे इथे कोणीच नाही हे सुर्वेंच्या वेदनेतून लक्षात येतं.. सुर्वे हे एक असं रसायन होतं की जे ट्युशन किंवा गाईड वाचून कवी झाले नाहीत, तर त्यांचा जन्मच हा एक कवी म्हणून झालेला आहे. त्यांचं जगण्याचं कारणच कविता आहे. म्हणून सुर्वे हे कविता ओठावर आणि काळजावर घेऊनच शेवटच्या श्वासापर्यंत जगले..



तसं जर पाहिलं तर अनेकांना आपल्या जगण्याचे कारण सांगता येत नाही. आपण जगतो का? या छोट्या आणि सोप्या प्रश्नाचे उत्तर कलावंताशिवाय कोणालाच देता येत नाही. आणि ज्याला जगण्याचं कारण सांगता येत नाही त्याचं जगणं कुरूप होतं आणि ज्याच्या मुठीमध्ये जगण्याचं कारण असतं त्याचं जगणं हे सुरूप होतं. म्हणून हे जगणं सुरूप करण्याचं काम साहित्य करत असतं.. सुर्वे यांचं सगळं शिक्षण हे मुंबईच्या फुटपाथवर झालेलं आहे. फुटपाथ हा त्यांचा गुरु होता. त्यामुळे चतकोर भाकरीसाठी आपला देह कामठीपुरात विकणाऱ्या बायकांचे ते हिरो होते. महाकाय अशा समुद्रातून या देशातून त्या देशात नेणाऱ्या तिथल्या कॉमन कामगारांचे ते हिरो होते. पावसाने कितीही दगा दिला तरी एक दिवस पेरा उगवेल म्हणून स्वतःला आणि बियाणाला जमिनीत पुरणाऱ्या शेतकऱ्यांचे ते हिरो होते. सुर्वे हे कामगारांचे, कष्टकऱ्यांचे आणि श्रमिकांचे हिरो होते...

जगण्यासाठी चाललेल्या लढाया, ही सगळी विषमता हे त्यांचे गुरु आहेत आणि त्यातून नारायण सुर्वे यांचा कवी उगवलेला आहे. म्हणून ते म्हणतात मी जसं जगण्यात आहे तसाच शब्दात आहे. माणसाची मर्यादा ही आहे की, तो दुभंगलेला आहे. कारण तो कवितेत वेगळा आणि जगण्यात वेगळा असतो. हे दुभंगलेपण जिथे असतं तिथे कला ही पूरती अस्सल माणसांची होत नाही.

सुर्वेंच्या कविता म्हणजे व्यवस्थेचं छाताड फोडून उगवलेलं वटवृक्ष आहे. सगळे दुष्काळ, महापूर पचवत जगण्याची लढाई लढणारे आणि लढत लढत व्यवस्था बदलाचे स्वप्न पाहणारे मुंबई मधील सगळे नायक हे सुर्वे यांच्या कवितेमध्ये पहिल्यांदा नायक झाले. त्यातून त्यांनी मार्क्स सिद्धांत मांडला की, हे जग सामान्य माणसं घडवतात. म्हणून सुर्वे हे त्यांचे नायक आहेत. विशेष म्हणजे हे जग बदलण्याच्या बाबतीत ते आश्वासक असून, आज नही तो कल दुनिया बदलने वाली है, हा विश्वास त्यांच्या कवितांनी दिला. सुर्वे म्हणजे समाजातील अंधार नाहीसा करणारे महाकवी होते. कारण सुर्वेंच्या कवितेत नाचणारी, भांडणारी, बोलणारी, शरीर विकणारी, मोलकरीण या नायिका येतात.

सुर्वेना महाराष्ट्राने आणि महाराष्ट्राला सुर्वेंनी भरभरून दिलं. म्हणून सुर्वेंना दोन माणसं हमखास ओळखतात. एक म्हणजे बस स्टैंडवरचा हमाल आणि दुसरा म्हणजे रेल्वेतला पोर्टल कारण हे सुर्वेंच्या कवितेतले अस्सल नायक आहेत...

सुर्वे म्हणजे असा एकच कवी ज्यांच्या कवितेवर नाटक झाले, डान्स झाला, संवाद झाले, ज्यांच्या कवितासंग्रहाच्या मुखपृष्ठावर वेगवेगळे प्रयोग झाले, ज्यांच्यावर डॉक्युमेंटरी झाली परंतु असा हा चौकटीत न मावणारा माणूस ज्याला पकडण्याचा प्रयत्न त्यांच्या शेवटपर्यंत अनेकांनी केला पण तो यशस्वी झाला नाही. नव्या माणसाची, नव्या युगाची पेरणी करणारा मी नवयुग आहे, हे सांगताना सुर्वे म्हणतात की, मी एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे.. सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे.. कारण सुर्वेंचा जन्म हा भाकरीचा चंद्र शोधण्यात गेला आहे.

म्हणून समाज चांगला व्हायचा असेल तर कलावंतांची खूप मोठी गरज असते. कारण या पृथ्वीकडे या ब्रह्मांडाकडे पाहताना जिथे धर्म थांबतो, त्याची मती खुंटते, जिथे विज्ञान थांबतं, त्याची प्रयोगशीलता खुंटते हे दोघेही जिथे थांबतात तिथे कलावंतांचे जग सुरू होतं. म्हणून कलावंत खूप महत्त्वाचे असून, हे जग फक्त आणि फक्त कलावंतालाच कळतं इतर कोणत्याही विश्वगुरूला नाही..

साहित्य जत्रा संमेलन यशस्वी करण्यासाठी संगमनेर साहित्य संघाचे अध्यक्ष रमेश शिंदे, उपाध्यक्ष डॉ. निलिमा निघुते, कार्याध्यक्ष डॉ. विवेक वाकचौरे, सचिव राजाभाऊ भांडगे, नितीन कोळपकर, अशोक वरुडे, ॲड.जयश्री शिंदे, आसावरी रत्नपारखी, इजाज अन्सारी, प्रा. कोमल म्हस्के व त्यांचे सर्व सहकारी यांनी विशेष परिश्रम घेऊन हे संमेलन यशस्वी केले आहे...

**शब्दांकन – विजय पाटील**
**मो. ९८२२०२०५०४**

# पेसा हक्कांसाठी अकोल्यात गुरूवारी मोर्चा

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) आदिवासींचे घटनात्मक हक्क, स्वायत्तता आणि रोजगाराचे अधिकार अबाधित राखण्यासाठी आदिवासी समाज महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने (गुरुवार दि.६) सकाळी अकोले येथे शांततापूर्ण लोकशाही मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि पोलीस निरीक्षक यांना पूर्वसूचना देण्यात आली आहे, असे मोर्चाचे समन्वयक ओंकार नवाळी व अरुण गोंदके यांनी सांगितले.

अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींचे घटनात्मक हक्कांचे संरक्षण, पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि भरती प्रक्रियेतील विसंगती दूर करणे हा या आंदोलनाचा मुख्य उद्देश आहे.

शासन आणि प्रशासनाकडे दहा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये १ जून, २०१४ रोजी राज्यपालांनी जारी केलेल्या मूळ अधिसूचनेनुसार पेसा अंतर्गत १७ संवर्गातील भरतीची अंमलबजावणी करावी, तसेच २९ ऑगस्ट, २०१९ च्या अधिसूचनेचा पुनर्विचार करून आवश्यक सुधारणा करून मूळ अधिसूचनेप्रमाणे भरती प्रक्रिया राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय ११ फेब्रुवारी, २०२६ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाचा पुनर्विचार करून तो पाचव्या अनुसूचीतील राज्यपालांच्या अधिसूचनेशी सुसंगत करावा, तसेच ५ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयानुसार कार्यरत सर्व मानधन कर्मचाऱ्यांना राज्यपालांच्या अधिसूचनेनुसार कायमस्वरूपी समायोजित करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 – 224761, मोबा. 7038170382

## संपादकीय...

# राष्ट्रकुलातील भारताचा सुवर्ण अध्याय...

ग्लासगो येथे पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताने केलेली कामगिरी प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची ठरली आहे. ३९ पदकांसह भारताने चौथे स्थान पटकावत जागतिक क्रीडाक्षेत्रात आपले वाढते सामर्थ्य पुन्हा एकदा सिद्ध केले. १२२ सदस्यीय भारतीय पथकाने १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि ९ कांस्य अशी पदकांची कमाई केली. ही कामगिरी केवळ पदकांची संख्या वाढल्याचे द्योतक नसून भारतातील क्रीडा संस्कृती अधिक व्यापक आणि सक्षम होत असल्याचे स्पष्ट संकेत देणारी आहे. एकेकाळी भारताची ओळख प्रामुख्याने कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन किंवा हॉकीपुरती मर्यादित होती. मात्र आता भारतीय खेळाडू विविध क्रीडा प्रकारांमध्ये सातत्याने यश मिळवत आहेत. यंदाच्या राष्ट्रकुल स्पर्धेत बॉक्सिंग, ज्युडो, वेटलिफ्टिंग, पॅरा-ॲथलेटिक्स आणि ॲथलेटिक्समध्ये मिळालेल्या यशाने भारताची क्रीडा क्षमता किती व्यापक झाली आहे, हे जगासमोर आले. भारतीय बॉक्सरांनी यंदाच्या स्पर्धेत सर्वाधिक प्रभाव पाडला. सात सुवर्णांसह एकूण दहा पदके जिंकत त्यांनी भारताच्या यशात सिंहाचा वाटा उचलला. पुरुषांसोबतच महिला बॉक्सरांनीही उल्लेखनीय कामगिरी करत भारतीय महिला खेळाडूंची वाढती ताकद अधोरेखित केली. योग्य प्रशिक्षण, सुविधा आणि प्रोत्साहन मिळाल्यास भारतीय महिला जागतिक स्तरावर सातत्याने यश मिळवू शकतात, याची प्रचिती या स्पर्धेत पुन्हा आली. यंदाच्या स्पर्धेतील आणखी एक सकारात्मक बाब म्हणजे ज्युडोमधील भारताची ऐतिहासिक कामगिरी. तुलनेने नवीन समजल्या जाणाऱ्या या खेळात भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट तंत्र, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या बळावर पदके जिंकत नवा इतिहास घडवला. भविष्यात या खेळात भारत अधिक मोठे यश संपादन करू शकतो, अशी आशा या कामगिरीने निर्माण केली आहे. वेटलिफ्टिंगमध्ये भारताने आपली परंपरा कायम राखली. अनुभवी खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन करत देशाला पदके मिळवून दिली. त्याचबरोबर ॲथलेटिक्समध्येही काही खेळाडूंनी अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी करत भविष्यासाठी आशादायी चित्र निर्माण केले. सर्वच स्पर्धांमध्ये यश मिळाले नसले तरी भारतीय ॲथलेटिक्स योग्य दिशेने वाटचाल करत असल्याचे स्पष्ट झाले. पॅरा-ॲथलेटिक्समध्ये भारतीय खेळाडूंचे यश विशेष प्रेरणादायी ठरले. शारीरिक अडचणींवर मात करून त्यांनी मिळवलेली पदके ही केवळ क्रीडा यशाची नव्हे, तर मानवी जिद्द, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाची जिवंत उदाहरणे आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून अनेक तरुणांना प्रेरणा मिळणार आहे. भारताच्या या यशामागे अनेक वर्षांची नियोजनबद्ध मेहनत आहे. केंद्र सरकारच्या 'खेळो इंडिया' आणि 'टार्गेट ऑलिम्पिक पोडियम'सारख्या योजनांमुळे गुणवंत खेळाडूंना प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध होत आहेत. आधुनिक प्रशिक्षण केंद्रे, वैज्ञानिक पद्धतीने होणारा सराव, पोषणतज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि प्रशिक्षकांचे योगदान यामुळे भारतीय खेळाडूंच्या कामगिरीत सातत्याने सुधारणा होत आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील अनेक खेळाडूंनाही आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा दाखवण्याची संधी मिळत आहे. तथापि, भारतासमोर अजूनही काही महत्त्वाची आव्हाने आहेत. ॲथलेटिक्स, जलतरण, जिम्नॅस्टिक्स आणि सायकलिंग यांसारख्या खेळांमध्ये जागतिक दर्जाची कामगिरी करण्यासाठी अधिक गुंतवणूक आणि नियोजन आवश्यक आहे. अनेक राज्यांमध्ये अद्यापही दर्जेदार क्रीडा सुविधा, प्रशिक्षक आणि आधुनिक प्रशिक्षण केंद्रांची कमतरता आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील खेळाडूंना पोषण, उपकरणे आणि स्पर्धेच्या अधिक संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रकुल स्पर्धेतील भारताची कामगिरी आगामी आशियाई स्पर्धा आणि ऑलिम्पिकसाठी निश्चितच सकारात्मक संकेत देणारी आहे. पदकांची संख्या वाढवण्याबरोबरच जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्यावर सातत्याने भर दिला, तर भारत क्रीडाक्षेत्रातील महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार करू शकतो. यासाठी सरकार, क्रीडा संघटना, खासगी क्षेत्र आणि समाज यांनी एकत्रितपणे खेळाडूंना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मधील भारताचे यश हे केवळ ३९ पदकांचे यश नाही; ते नव्या भारताच्या आत्मविश्वासाचे, खेळाडूंच्या अथक परिश्रमाचे आणि देशातील विकसित होत असलेल्या क्रीडा संस्कृतीचे प्रतीक आहे. ही विजयी परंपरा कायम राखण्यासाठी तळागाळातील प्रतिभेला संधी, आधुनिक सुविधा आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक आहे. भारताने आता केवळ स्पर्धांमध्ये सहभागी होण्यापेक्षा जागतिक क्रीडाक्षेत्रात नेतृत्व करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. हीच राष्ट्रकुल २०२६ स्पर्धेची सर्वात मोठी देणगी आणि भारतासाठी उज्ज्वल भविष्याची नांदी ठरेल.

# सहकार क्षेत्रात पतसंस्थांच्या माध्यमातून मोठी क्रांती - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील पतसंस्थांच्या २४०० कोटींच्या ठेवी असून संगमनेरच्या विकासासाठी मोठा हातभार लावला आहे. प्रशिक्षण घेणे ही काळाची गरज आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे पतसंस्थांच्या कामकाजात निकोप वाढ होऊन पतसंस्थेच्या कामाचा गुणवत्ता पूर्वक दर्जा सुधारेल. नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व संगमनेर तालुका पतसंस्था फेडरेशन चा हा उपक्रम कौतुकास्पद असून पतसंस्थांच्या चळवळीला बळ देणारा आहे.संगमनेर तालुक्याच्या विकासाला पतसंस्थांचे फार मोठे योगदान लाभलेले आहे. सहकार क्षेत्रात पतसंस्थांच्या माध्यमातून मोठी क्रांती झाली आहे.असे प्रतिपादन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

संगमनेर येथील भंडारी मंगल कार्यालय येथे नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था फेडरेशन,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन संगमनेर तालुका पतसंस्था फेडरेशन व तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने संचालक मंडळ,सीईओ, जनरल मॅनेजर यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कार्यकारी अध्यक्ष काकासाहेब कोयटे,माजी सहकार आयुक्त व निबंधक शैलेश कोतमीरे,अपर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्षवसंत लोढा, कार्याध्यक्ष गोपाळ पाटील,व्यवस्थापक महेश जाधव,संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष बापूसाहेब टाक,संतोष कोटे,सायबर तज्ञ अथर्व भांबुरकर,मराठा सेवा पतसंस्थेचे उपाध्यक्ष उदय अनभुले,संग्राम पतसंस्थेचे चेअरमन राणीप्रसाद मुंदडा आदी उपस्थित होते.

काकासाहेब कोयटे म्हणाले, प्रशिक्षण हे पतसंस्थेच्या विकासाचा गाभा असून आज या ठिकाणी माजी सहकार आयुक्त शैलेश कोतमीरे व माजी अप्पर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर यांनी या प्रशिक्षण वर्गात पतसंस्थांना विशेष मार्गदर्शन केले आहे.

वसंत लोढा म्हणाले,नगर जिल्ह्यातील पतसंस्था चळवळ ही महाराष्ट्राच्या पतसंस्था चळवळीला मार्गदर्शक व्हावी.या उद्देशाने नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अशा पद्धतीने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून संगमनेर तालुक्यापासून प्रशिक्षण कार्यशाळेचा प्रारंभ करण्यात आला आहे.

या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेसाठी संगमनेर तालुक्यातील पतसंस्थांचे २००हुन अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राणीप्रसाद मुंदडा यांनी केले.तर आभार संगमनेर तालुका फेडरेशनचे अध्यक्ष बापूसाहेब टाक यांनी मानले.

# अमृतवाहिनी तंत्रनिकेतनमध्ये प्रथम वर्ष पालक मेळावा उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृतवाहिनी तंत्रनिकेतन, संगमनेर येथे शैक्षणिक वर्ष २०२६ - २७ मधील प्रथम वर्ष डिप्लोमा अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा पालक मेळावा ३ ऑगस्ट २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडला.



हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष मा. आ. बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीर तांबे तसेच कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमासाठी अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी संस्थेचे व्यवस्थापक तथा तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ, डायरेक्टर अकॅडमिक डॉ. जे. बी. गुरव, उपप्राचार्य प्रा.जी.बी.काळे, सर्व विभागप्रमुख, पालक प्रतिनिधी आनंदराव वर्पे, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.जे.बी.गुरव यांनी तांत्रिक शिक्षणाचे बदलते स्वरूप, उद्योग क्षेत्रातील वाढत्या संधी, कृत्रिम बुद्धिमत्ता, कौशल्यविकास आणि भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवण्याचे आवाहन केले.

यावेळी प्राचार्य प्रा.व्ही.बी.धुमाळ यांनी तंत्रनिकेतनच्या उत्कृष्ट शैक्षणिक परंपरेची माहिती देताना शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मध्ये ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत ६२० हून अधिक विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याचा उल्लेख केला. तसेच उद्योगाभिमुख शिक्षण, अत्याधुनिक प्रयोगशाळा, कौशल्यविकास उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती त्यांनी पालकांना दिली.

उपप्राचार्य प्रा.जी.बी.काळे यांनी संस्थेतील विविध अभ्यासक्रम, आधुनिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी संस्थेचे नियम पाळून गुणवत्ता, शिस्त आणि परिश्रम यांच्या बळावर पालकांची स्वप्ने साकार करावीत असे आवाहन त्यांनी केले. प्रथम वर्ष समन्वयक प्रा.जे.के.सातपुते यांनी प्रास्ताविकात पालक मेळाव्याचा उद्देश स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व संस्थेतील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थिनी प्रतिनिधी स्नेहा दरंदले हिने विद्यार्थ्यांच्या वतीने मनोगत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी आनंदराव वर्पे यांनी पालक आणि संस्था यांच्यातील सातत्यपूर्ण संवाद विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक असल्याचे सांगत पालकांची भूमिका स्पष्ट केली.

# समता पतसंस्थेच्या राहाता शाखा व्यवस्थापकास अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

राहाता- समता नागरी पतसंस्थेच्या राहाता शाखेतील बहुचर्चित बँक खाते गैरव्यवहार प्रकरणात शिर्डी पोलिसांनी मोठी कारवाई करत शाखा व्यवस्थापक मिलिंद बनकर यास मंगळवारी रात्री अटक केली आहे. या कारवाईमुळे बँक वर्तुळात तीव्र खळबळ उडाली आहे. बुधवारी संशयित आरोपी बनकर याला राहाता न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ७ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी भोंदू अशोक खरात याने खोत्तेदारांना कोणत्याही प्रकारची माहिती न देता तब्बल १०८ व्यक्तींच्या नावावर बँक खाती उघडली होती. यो सर्व खात्यांबर नॉमिनी (वारसदार) म्हणून स्वतःचे नाव लावून कोट्यवधी रुपयांचे संशयास्पद व्यवहार केल्याचा आरोप खातेदारांनी केला होता. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

करण्यात आला. पोलिसांनी दोन दिवसांपूर्वीच मुख्य आरोपी अशोक खरात याला अटक केली असून तो सध्या ७ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडीत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा सखील तपास सुरू आहे. एकाच दिवशी १०८ खाती उघडून गैरव्यवहारास खतपाणी घालणारे शाखा व्यवस्थापक मिलिंद बनकर यांना मंगळवारी रात्री १० वाजता शिर्डी पोलिसांनी ताब्यात घेतले. शाखा व्यवस्थापकाने नेमक्या कोणाच्या सांगण्यावरून व दबावाखाली एकाच दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणावर खाती उघडली, याचा शोध आता पोलीस घेत आहेत. दरम्यान, तालुक्यातील इत काही बँकांमध्येही अशाच प्रकारे बोगस खाती उघडण्यात आल्याची जोरदार चर्चा सुरू असल्याने इतर बँक व्यवस्थापकांचेही धाबे दणाणले आहेत.

SUBSCRIBE
DAINIK
YUVAVARTA
YOUTUBE
CHANNEL

पान १ वरून

# सरळ रेल्वे मार्गासाठी...

**केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी निर्णायक आंदोलन-** केंद्र सरकारला जाग आणण्यासाठी आणि या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी संपूर्ण पुणे - नाशिक महामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे नसून सर्वसामान्य जनतेचे आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या आंदोलनात सहभागी होऊन आपली ताकद दाखवावी, असे आवाहन त्यांनी केले.

**वाहतुकीचा वाढता ताण ; रेल्वेच ठरेल पर्याय -** सध्या पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत असून, दोन-अडीच तासांचा प्रवास करण्यासाठी सहा-सहा तास खर्च करावे लागत आहेत. रस्त्यांची अवस्थाही अनेक ठिकाणी खराब झाली आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे तांबे यांनी सांगितले. संगमनेर, अकोले तसेच शेजारच्या परिसरातील हजारो युवक-युवती नोकरी, शिक्षण, उद्योग-व्यवसाय आणि इतर कामांसाठी पुणे व नाशिक येथे ये-जा करतात. त्यामुळे दोन्ही शहरांवरही लोकसंख्येचा आणि वाहतुकीचा मोठा ताण वाढत आहे. सरळ रेल्वेमार्ग झाल्यास सिन्नर, संगमनेर, खेड, नारायणगाव, जुन्नर, मंचर, चाकण यांसह पुणे आणि नाशिक या दोन्ही शहरांनाही मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**'क्रांतीदिनी रस्त्यावर चक्काजाम'** - आता क्रांती करण्याची वेळ आली आहे. ९ ऑगस्ट क्रांतीदिनी सकाळी ९ वाजता जिथे शक्य असेल, तेथे नागरिकांनी रस्त्यावर उतरून चक्काजाम आंदोलन करावे. एकाच दिवशी आणि एकाच वेळी संपूर्ण पुणे-नाशिक महामार्ग ठप्प करून केंद्र सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाईल, असे तांबे यांनी स्पष्ट केले.

**सर्वपक्षीय नेते सहभागी होणार** - आमदार सत्यजित तांबे यांनी नाशिक पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी क्रांतीदिने रास्ता रोको आंदोलनाची हाक दिली असून यामध्ये अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार निलेश लंके, आमदार शरद दादा सोनवणे, आमदार बाबाजी काळे, आमदार विलास लांडे, आमदार महेश लांडगे, माजी मंत्री माणिकराव कोकाटे, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्यासह विविध मान्यवर सहभागी होणार आहेत..

पाहिजेत
क्षितिज इलेक्ट्रीकल
घुलेवाडी, ता. संगमनेर
अनुभवी अकाऊंटट
पाहिजे - २ जागा
(पुर्णवेळ)
MS Offics Tally
ज्ञान आवश्यक
– संपर्क –
7007608875

पाहिजेत
एक पुरुष
कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता
येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
– संपर्क –
7972999316

पाहिजेत
दुकान कामासाठी
होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई
कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

फ्लॅट विकणे आहे
2 BHK फ्लॅट
विकणे आहे
नवीन बांधकाम,
स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स,
चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

फॅकल्टी पाहिजे
अगस्ती अकॅडमी
संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे,
संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र
बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727






# एक समृद्ध व्यक्तिमत्त्व !



- सौ. रचना मनिष मालपाणी
नगरसेविका, संगमनेर नगरपरिषद
संस्थापिका - इंडस् फाऊंडेशन एनजिओ फॉर रूरल चिल्ड्रन्स हेल्थ अँड एज्युकेशन







विचारसरणी आणि जगण्याची एक सुंदर पद्धत आहे. त्यांच्या दिवसाची सुरुवात नेहमी घरातील देवापुढे प्रार्थना करून आणि सूर्याला अर्घ्य अर्पण करूनच होते. ते घरी असोत, व्यवसायानिमित्त प्रवासात असोत किंवा जगात कुठेही असोत, त्यांच्या या नित्यक्रमात कधीच खंड पडत नाही. परिस्थिती बदलते, ठिकाण बदलतं; पण त्यांची श्रद्धा, शिस्त आणि दिनचर्या मात्र तितक्याच निष्ठेने कायम राहते. भगवद्गीता हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक अध्यायातील भगवान श्रीकृष्णांचा संदेश त्यांनी केवळ वाचला नाही, तर तो मनापासून समजून घेत आपल्या जीवनातही उतरवला आहे. आजही वेळ मिळेल तेव्हा भगवद्गीतेचं वाचन, श्लोकांचं चिंतन आणि त्यांच्या अर्थाचा अभ्यास ते नियमितपणे करतात.

रामायण आणि महाभारत यांचाही त्यांचा सखोल अभ्यास आहे. या ग्रंथांतील प्रसंग, त्यामागील विचार, पात्रांचं मनोविज्ञान आणि जीवनमूल्यं यांचं त्यांचं, आकलन विलक्षण आहे. एखादा प्रसंग ते इतक्या समर्पकपणे उलगडून सांगतात की, ऐकणाऱ्यालाही त्या कथांमधील जीवनदर्शन नव्याने अनुभवायला मिळतं. अध्यात्मावरील चर्चांमध्ये सहभागी होणं त्यांना विशेष आवडतं. विविध विषयांवर विद्वान, अभ्यासक आणि संतविचारांच्या जाणकारांशी संवाद साधताना त्यांचा अभ्यास, तर्कशुद्ध विचार आणि नेमकी मांडणी सहज जाणवते. आपल्या सण-उत्सवांमागील शास्त्रीय आणि पौराणिक संदर्भ ते अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगतात. त्यामुळे आपल्या परंपरांमागचा गाभा अधिक स्पष्ट होतो आणि त्यांच्याविषयीचा आदरही अधिक दृढ होतो. त्यांच्याकडे पाहिल्यावर जाणवतं की, खऱ्या अर्थाने अध्यात्म हे केवळ मंदिरात किंवा ग्रंथांमध्ये नसतं; ते विचारांत, आचरणात, शिस्तीत आणि प्रत्येक कृतीतून प्रकट होत असतं. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हा पैलू अनेकांना माहीतही नाही; पण मला मात्र तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात शांत, सर्वात गहन आणि सर्वात प्रेरणादायी पैलू वाटतो.

### कुटुंब आणि नात्यांचा समतोल



संपूर्ण कुटुंबाला एकत्र ठेवण्याची ताकद ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक महत्त्वाची जमेची बाजू आहे. मनीषजींसाठी कुटुंब ही केवळ जबाबदारी नसून त्यांच्या आयुष्याची खरी ताकद आहे. कितीही मोठ्या जबाबदाऱ्या असल्या तरी आपल्या माणसांसाठी वेळ काढणं, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणं आणि प्रत्येक नातं मनापासून जपणं, याला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिलं आहे. त्यांच्या आयुष्यात त्यांच्या चारही भावांचं स्थान अत्यंत विशेष आहे. पाचही भावांमधील परस्पर प्रेम, विश्वास आणि जिव्हाळा पाहिला की, आजच्या काळातही अशी नाती इतकी घट्ट जपली जाऊ शकतात, याचं मनापासून कौतुक वाटतं. प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व आणि विचार वेगळे असले, तरी एकमेकांविषयीचा आदर, विश्वास आणि आपुलकी कायम तितकीच दृढ राहिली आहे.

मनीषजींचं प्रत्येक भावासोबतचं नातं स्वतंत्र, पण तितकंच घट्ट आहे. सुख असो वा प्रतिकूल परिस्थिती, गरज भासली की निसंकोचपणे एकमेकांच्या पाठीशी उभं राहणं, प्रत्येकाच्या यशात मनापासून आनंद मानणं, हीच त्यांच्या नात्याची खरी ओळख आहे. ते नेहमी म्हणतात, “माझी खरी ताकद माझे भाऊ आहेत.” आणि तितकंच खरं म्हणजे त्यांच्या भावांनाही मनीषजींबद्दल तितकाच अभिमान, तितकंच प्रेम आणि तितकाच विश्वास आहे. या पाच भावांची एकजूट हीच आमच्या कुटुंबाची सर्वात मोठी संपत्ती आहे. आपल्या बहिणींवरही त्यांचं तितकंच प्रेम आहे. प्रत्येक सण-समारंभात त्यांच्याप्रति असलेला जिव्हाळा आणि आपुलकी सहज जाणवते. आईबद्दलचा त्यांचा आदर, प्रेम आणि जपणूक मनाला स्पर्श करणारी आहे. तिच्या भावना समजून घेणं, तिचा मान राखणं आणि तिची मनापासून काळजी घेणं, हे त्यांनी नेहमीच जपलं आहे.

मला नेहमी विशेष भावणारी गोष्ट म्हणजे, त्यांनी केवळ स्वतःचं कुटुंबच नाही, तर माझ्या माहेरच्यांनाही तितक्याच आत्मीयतेने आपलंसं केलं. माझे आई-वडील, भाऊ-बहीण आणि माझ्या परिवारातील प्रत्येक व्यक्तीशी त्यांचं अतिशय जिव्हाळ्याचं नातं आहे. जसं ते आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभे राहतात, तसंच माझ्या माहेरच्यांसाठीही प्रत्येक वेळी तितक्याच आपुलकीने उभे राहिले आहेत. त्यामुळे माझ्या माहेरच्यांच्या मनातही त्यांच्याविषयी अपार प्रेम आणि आदर आहे. त्यांचं प्रेम केवळ जवळच्या नात्यांपुरतं मर्यादित नाही. विस्तारित परिवारातील नातेसंबंधही ते तितक्याच जिव्हाळ्याने जपतात. नातेवाईकांशी सातत्याने संपर्क ठेवणं, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणं आणि नात्यांमधील उब कायम राखणं, हे ते अगदी सहजपणे करतात. मनीषजी नेहमी म्हणतात, “आयुष्यातील सर्वात मोठी संपत्ती ही पैसा किंवा यश नसून माणसं असतात.” त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक नात्याकडे पाहिलं की, या विचाराचं प्रतिबिंब स्पष्टपणे दिसून येतं. आयुष्यभर त्यांनी माणसं जोडली, त्यांना मनापासून जपलं आणि प्रत्येक नातं तितक्याच आत्मीयतेने जिवंत ठेवलं आहे.

### पुढची पिढी घडवताना

जय हा आमचा एकुलता एक मुलगा. त्याच्या जडणघडणीत मनीषजींनी केवळ प्रेमळ वडिलांचीच नव्हे, तर विचारपूर्वक आणि समंजस पालकाची भूमिकाही अत्यंत समर्थपणे निभावली. मुलांवर बंधनं घालण्यापेक्षा त्यांना योग्य दिशा देणं, त्यांच्यावर विश्वास ठेवणं आणि गरज भासेल तेव्हा शांतपणे मार्गदर्शन करणं, हीच त्यांच्या पालकत्वाची खरी ओळख आहे. जयच्या बालपणापासून त्याच्या जडणघडणीकडे त्यांनी अत्यंत सजगपणे लक्ष दिलं.

अभ्यासाइतकंच खेळ, साहस आणि नवनवीन अनुभवही आयुष्य समृद्ध करतात, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यामुळे विविध क्रीडा प्रकार शिकण्याची, नवनवीन गोष्टी अनुभवण्याची आणि स्वतःच्या क्षमतांची ओळख करून घेण्याची संधी त्यांनी त्याला नेहमी दिली. ऑस्ट्रेलियामध्ये जयच्या Scuba Diving Certification साठी आम्ही तब्बल आठ दिवस एका ठिकाणी मुक्काम केला होता.



प्रवासादरम्यानही शक्य असेल तिथे Surfing, Adventure Sports किंवा एखादं नवीन कौशल्य शिकण्याची संधी त्याला मिळावी, यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असायचे. जय लहान असताना दर रविवारी त्याच्यासोबत वेळ घालवणं हा त्यांचा जणू नियमच होता. आसपासच्या विविध ठिकाणी त्याला घेऊन जाणं, त्या परिसराची माहिती सांगणं, व्यवसाय, महापुरुष, यशस्वी उद्योजक आणि आयुष्याबद्दलच्या अनेक छोट्या-मोठ्या गोष्टींवर त्याच्याशी संवाद साधणं - या सहज संवादातून त्यांनी त्याच्या मनात मोठी स्वप्नं पाहण्याची, धाडसानं विचार करण्याची आणि उद्योजकतेची बीजं



नकळत पेरली. जयच्या शिक्षणापासून ते त्याच्या करिअरपर्यंत प्रत्येक निर्णय त्यांनी अत्यंत विचारपूर्वक घेतला. दहावीनंतर कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा, कोणता अभ्यासक्रम त्याच्या भविष्यासाठी अधिक योग्य ठरेल, यासाठी त्यांनी अनेक जाणकारांशी चर्चा केली, विविध पर्यायांचा सखोल अभ्यास केला आणि त्यानंतरच निर्णय घेतला. जयच्या भविष्याची पायाभरणी करताना त्यांनी घेतलेली मेहनत आणि प्रत्येक निर्णयामागचा त्यांचा सखोल विचार आजही मला मनापासून भावतो. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मला सर्वाधिक भावणारा गुण म्हणजे योग्य वेळ आली की मुलांना त्यांच्या आयुष्याची सूत्रं त्यांच्या हातात देण्याची त्यांची तयारी. ते सहजपणे म्हणतात, “पालक म्हणून आपण जे करायचं होतं ते मनापासून केलं. आता त्याने स्वतःचा मार्ग स्वतः घडवावा.” इतकं प्रेम असूनही त्यात मालकीची भावना नाही. मुलांवर विश्वास ठेवून त्यांना स्वतःच्या पायावर ठामपणे उभं राहू देणं, हीच त्यांच्या पालकत्वाची खरी ताकद आहे. आज जय आणि मनीषजी यांचं नातं केवळ वडील-मुलाचं राहिलेलं नाही; तर ते परस्पर विश्वास, मैत्री आणि आदरावर उभं असलेलं एक सुंदर नातं आहे. लहानपणी मनीषजींनी जयला शिकवलं, घडवलं आणि मार्गदर्शन केलं; आज जय स्वतःचे निर्णय घेणारा आणि स्वतःचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणारा तरुण म्हणून उभा आहे. विशेष म्हणजे, त्याच्याकडूनही नव्या गोष्टी शिकण्याची तयारी आणि नम्रता मनीषजींमध्ये तितकीच आहे. मुलाकडून शिकण्यात कमीपणा न मानता त्याचा आनंदाने स्वीकार करणं, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष गुण आहे.

चार वर्षांपूर्वी श्रेया आमच्या कुटुंबात सून म्हणून आली आणि मनीषजींनी तिलाही सून म्हणून नव्हे, तर मुलगी म्हणूनच स्वीकारलं. तिच्या विचारांचा, स्वप्नांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा त्यांनी नेहमी आदर केला. तिला विश्वास, स्वातंत्र्य आणि प्रोत्साहन दिलं. त्यामुळे सासरे-सुनेचं नातं न राहता त्यांच्यात सहजता, आपुलकी आणि परस्पर आदरावर आधारलेलं सुंदर नातं निर्माण झालं. माझ्या दृष्टीने, मुलांना योग्य संस्कार देणं, त्यांच्यावर विश्वास ठेवणं आणि योग्य वेळ आली की त्यांना स्वतःचं आकाश शोधण्यासाठी मुक्त करणं, हीच त्यांच्या पालकत्वाची खरी ओळख आहे.

### माझे जीवनसाथी

एक प्रेमळ पिता, समंजस कुटुंबवत्सल, प्रत्येक नातं मनापासून जपणारा माणूस आणि अनेकांसाठी खंबीर आधार म्हणून मी त्यांना अनेक रूपांत अनुभवत आले आहे. पण या सगळ्या रूपांपलीकडे, माझ्यासाठी त्यांची सर्वात सुंदर ओळख म्हणजे - माझे जीवनसाथी.

वयाच्या एकोणीसाव्या वर्षी आमच्या सहजीवनाची सुरुवात झाली. आज ३३ वर्षांनंतरही त्यांच्या सहवासातून मिळणारा विश्वास, सुरक्षिततेची भावना आणि खंबीर आधार तसाच कायम आहे. या प्रवासात ते केवळ माझे पती राहिले नाहीत; वेळेनुसार त्यांनी अनेक भूमिका सहजपणे निभावल्या. कधी जिवलग मित्र बनून माझं मन समजून घेतलं, कधी वडिलांसारखा आधार दिला, कधी आईसारखी माया केली, तर कधी कोणताही गाजावाजा न करता शांतपणे माझ्या पाठीशी उभे राहिले. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर ज्या आधाराची गरज भासली, तो आधार मला त्यांच्यामध्ये मिळत गेला. या सहजीवनात आम्ही असंख्य आनंदाचे क्षण अनुभवले, अनेक सुंदर आठवणी जपल्या आणि काही कठीण प्रसंगांनाही एकत्र सामोरं गेलो. मतभेद झाले, रुसवे-फुगवेही झाले; पण प्रत्येक अनुभवाने आमचं नातं अधिक परिपक्व आणि दृढ होत गेलं. जगातील अनेक देश फिरलो, अनेक अविस्मरणीय क्षण अनुभवले; पण या सगळ्यापेक्षा मौल्यवान गोष्ट म्हणजे एकमेकांना अधिकाधिक समजून घेणं. आज अनेकदा शब्दांचीही गरज भासत नाही. त्यांच्या मनात काय चाललं आहे, हे मला सहज समजतं आणि माझ्या मनातलं त्यांनाही तितक्याच सहजतेने उमगतं.

मनीषजी स्वभावाने मितभाषी आहेत; पण त्यांनी माझ्यासाठी केलेल्या असंख्य छोट्या-छोट्या गोष्टी, न बोलता घेतलेली काळजी आणि प्रत्येक प्रसंगी दिलेली साथ यांतून त्यांचं प्रेम सतत जाणवतं. त्यांच्या बाबतीत मला गोष्ट जाणवते - त्यांच्या कृती त्यांच्या शब्दांपेक्षा नेहमीच मोठ्या असतात. त्यांचा स्वभाव अत्यंत निर्मळ आणि पारदर्शक आहे. मनात एक आणि ओठांवर दुसरं, असं त्यांच्या स्वभावात कधीच नसतं. त्यामुळे एखादी गोष्ट चुकीची वाटली, तर ती ते अत्यंत स्पष्टपणे सांगतात. त्यांच्या स्पष्ट शब्दांमुळे कधी कधी त्या क्षणी मन दुखावतं; पण कालांतराने जाणवतं की त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट माझ्या भल्यासाठीच होती. अनेक प्रसंगी त्यांच्या शब्दांचा खरा अर्थ मला नंतर उमगला आणि ते किती योग्य होते, याची जाणीव झाली. बाहेरून ते अत्यंत खंबीर, ठाम आणि कणखर वाटतात; पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वामागे एक अतिशय प्रेमळ, संवेदनशील आणि निरागस मन दडलं आहे. त्यांची माया ते शब्दांत फारशी व्यक्त करत नाहीत; ती त्यांच्या कृतीतून, काळजीतून आणि निःशब्द साथीतून सतत जाणवत राहते.

आज मी जे काही करू शकले, समाजात ज्या जबाबदाऱ्या पार पाडू शकले किंवा लोकांपर्यंत पोहोचू शकले, त्यामागे माझे प्रयत्न निश्चितच आहेत; पण त्या प्रत्येक प्रयत्नामागे मनीषजींची निःशब्द, भक्कम साथ आहे. माझ्या प्रत्येक स्वप्नाला त्यांनी स्वतःचं स्वप्न मानलं. तन, मन आणि धनाने त्यांनी मला साथ दिली. मी अधिक आत्मविश्वासाने पुढे



जावं, माझ्या क्षमतेचा पूर्ण उपयोग करावा आणि माझ्या प्रत्येक स्वप्नाला नवी दिशा मिळावी, यासाठी त्यांनी प्रत्येक टप्प्यावर मला प्रोत्साहन दिलं. म्हणूनच माझ्या कार्यात त्यामागे त्यांचा सिंहाचा वाटा आहे. मी निरोगी, आनंदी आणि उत्साही राहावं, यासाठी ते नेहमीच मनापासून प्रयत्नशील असतात. त्यांच्या सहवासात मला नेहमीच एक विलक्षण सहजता जाणवते. कोणताही दिखावा न करता, मला जसे आवडेल तसं राहण्याचं स्वातंत्र्य त्यांनी मला दिलं. माझ्या प्रत्येक भावनेचा, प्रत्येक विचाराचा त्यांनी मनापासून आदर केला. या नात्यातील विश्वास, आपुलकी आणि निःस्वार्थ साथ हीच माझ्यासाठी आयुष्यातील सर्वांत मोठी संपत्ती आहे. आज मागे वळून पाहताना मनात एकच भावना दाटून येते - मनीषजींसारखे जीवनसाथी लाभणं, हे माझ्या आयुष्यातील सर्वात मोठं भाग्य आहे.

हा लेख म्हणजे आमच्या सहप्रवासात अनुभवलेल्या काही आठवणी, मनात जपलेल्या काही भावना आणि अविस्मरणीय क्षणांना शब्दबद्ध करण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे. कारण मनीषजींसारख्या व्यक्तिमत्त्वाची संपूर्ण ओळख शब्दांत मांडणं कधीच शक्य नाही. ईश्वरचरणी एकच प्रार्थना - आपला हा सहप्रवास असाच प्रेम, विश्वास आणि आनंदाने फुलत राहो. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रकाश असाच असंख्य आयुष्यांना दिशा, प्रेरणा आणि उभारी देत राहो.

**वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!**

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# रोटरी क्लब संगमनेरच्या अध्यक्षपदी समीर शाह तर सचिवपदी संकेत काजळे यांची निवड

## खजिनदारपदी मोहित मंडलिक

## पदग्रहण समारंभ उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : सामाजिक बांधिलकी जपत सेवा, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ संगमनेरच्या ४३ व्या पदग्रहण समारंभाचा दिमाखदार सोहळा रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी समीर सुभाष शाह यांनी अध्यक्षपदाची, संकेत राजेंद्र काजळे यांनी सचिवपदाची तर मोहित नामदेव मंडलिक यांनी खजिनदारपदाची सूत्रे स्वीकारली. तसेच नूतन बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचाही पदग्रहण सोहळा पार पडला.

कार्यक्रमास रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे प्रांतपाल **(DG)** जयेशभाई पटेल, आमदार सत्यजित तांबे, उद्योजक राजेशजी मालपाणी, सहाय्यक प्रांतपाल (AG) भागनाथ काटे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. यावेळी मागील वर्षाचे अध्यक्ष विश्वनाथ मालाणी व सचिव सौरभ म्हाळस यांनी नूतन पदाधिकाऱ्यांकडे पदाची सूत्रे सुपूर्द केली.

नूतन अध्यक्ष समीर शाह यांनी आपल्या मनोगतात आगामी वर्षातील सेवा प्रकल्पांची माहिती देताना सांगितले की, शैक्षणिक क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देत सोयी-सुविधांपासून वंचित असलेल्या शाळांमध्ये डिजिटल बोर्ड, ग्रीन बोर्ड, हॅन्डवॉश स्टेशन, विद्यार्थ्यांसाठी शूज, ग्रंथालयांसाठी पुस्तके आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच रोटरी आय केअर हॉस्पिटलच्या माध्यमातून डोळ्यांच्या आरोग्यासाठी विविध सेवा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत रोटरीची सेवा पोहोचविण्यासाठी संपूर्ण टीम कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सामाजिक बांधिलकीचा आदर्श जपत अध्यक्ष समीर शाह व त्यांच्या परिवारातर्फे गरजू शालेय विद्यार्थ्यांसाठी ३०० बुटांच्या जोड्यांचे वितरण करण्यात आले, तर सचिव संकेत काजळे व त्यांच्या परिवारातर्फे रोटरी आय केअर हॉस्पिटलसाठी वॉशिंग मशीन भेट देण्यात आले. तसेच रोटरी क्लबमध्ये नव्याने सहभागी झालेल्या सदस्यांचेही स्वागत करून त्यांना रोटरी परिवारात सामील करण्यात आले.

प्रमुख पाहुणे आमदार सत्यजित तांबे यांनी आपल्या भाषणात रोटरी आय केअर हॉस्पिटलसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. तसेच रोटरीने शहरातील एखादा महत्त्वाचा नागरी प्रश्न हाती घेऊन तो पूर्णपणे मार्गी लागेपर्यंत सातत्याने त्यावर काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. नगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठीही रोटरीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. उद्योजक राजेशजी मालपाणी यांनी रोटरीच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करताना सांगितले की, रोटरी क्लब म्हणजे समाजातील गरज ओळखणारी संवेदनशील संस्था असून समस्यांवर प्रत्यक्ष उपाय अमलात आणणारी संघटित शक्ती आहे. रोटरीच्या या सेवायज्ञात मालपाणी परिवार यापुढेही नेहमीप्रमाणे सक्रिय सहभाग व सहकार्य देत राहील, असे त्यांनी सांगितले.

प्रांतपाल जयेशभाई पटेल यांनी डिस्ट्रिक्टच्या आगामी वर्षातील महत्त्वाकांक्षी उपक्रमांची माहिती देताना सांगितले की, डिस्ट्रिक्टमधील सर्व क्लबच्या माध्यमातून शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वर्षभरात २० हजारांहून अधिक मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया मोफत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दुर्गम भागातील शाळांमध्ये मुलींच्या आरोग्यावर विशेष भर देण्यात येणार असून विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार स्वच्छतागृहांची उभारणी केली जाणार आहे. समाजातील उद्योजक, दानशूर व्यक्ती व नागरिकांनी रोटरीच्या सेवाकार्यात आर्थिक योगदान देऊन सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान नूतन पदाधिकाऱ्यांसह बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा परिचय करून देण्यात आला. शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, रोटरी सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनायक नागरे व भारतभूषण नावंदर यांनी केले, तर सचिव संकेत काजळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लब ऑफ संगमनेरच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विवाहितेची आत्महत्या

## पती, सासू-सासऱ्यांविरुद्ध गुन्हा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरालगत असलेल्या ढोलेवाडी येथील २६ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मृत विवाहितेच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून तिचा पती, सासू आणि सासरे यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रेखा अर्जुन गायकवाड (वय २६) यांचा विवाह सन २०१५ मध्ये अर्जुन शिवाजी गायकवाड (रा. ढोलेवाडी, ता. संगमनेर) यांच्याशी झाला होता. त्यांना समर्थ आणि सिद्धार्थ अशी दोन मुले आहेत. लग्नानंतर रेखा या सासरी संयुक्त कुटुंबात राहत होत्या. मृत विवाहितेचा भाऊ संदीप बाळासाहेब जाधव (रा. शिरसगाव, ता. श्रीरामपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, विवाहानंतर रेखा यांना पती, सासू आणि सासरे यांच्याकडून वारंवार शारीरिक व मानसिक त्रास दिला जात होता. पतीचे अन्य महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरूनही तिला त्रास सहन करावा लागत असल्याचे तिने अनेकदा फोनवरून माहेरी सांगितले होते. तसेच किरकोळ कारणांवरून सासू-सासरे दमदाटी करून मारहाण करत असल्याची माहितीही तिने दिली होती. मात्र परिस्थिती सुधारेल, या आशेने माहेरच्यांनी तिला समजूत घातली होती. दरम्यान, ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी रेखा यांना रुग्णालयात दाखल केल्याची माहिती नातेवाईकांकडून मिळाल्यानंतर कुटुंबीय संगमनेर येथे दाखल झाले.

फिर्यादीनुसार, सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या सातत्याच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून रेखा यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या फिर्यादीवरून पती अर्जुन शिवाजी गायकवाड, सासू सुमन शिवाजी गायकवाड आणि सासरे शिवाजी रामभाऊ गायकवाड (सर्व रा. ढोलेवाडी, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ I ✻ कर्ज व्याजदर कमी I ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# न्यायालयाचे पाच निकाल धाब्यावर; सामाईक रस्त्यासाठी ग्रामस्थांचे उपोषण




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मौजे मंगळापूर (ता. संगमनेर) येथील सर्वे क्रमांक ७८ मधील सामाईक रस्त्यावरील अतिक्रमण हटवून रस्ता खुला करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी प्रांत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. महसूल प्रशासनापासून उच्च न्यायालयापर्यंत पाच ठिकाणी आपल्या बाजूने निर्णय मिळूनही प्रत्यक्षात रस्ता खुला करण्यात आलेला नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.

आप्पा कोंडाजी पवार व इतर ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, सर्वे क्रमांक ७८ मधील सामाईक रस्ता काही व्यक्तींनी बेकायदेशीरपणे अडवून त्यावर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे या सर्वे क्रमांकातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात ये-जा करण्यास तसेच शेतीची अवजारे आणि यंत्रसामग्री ने-आण करण्यास मोठा अडथळा निर्माण होत आहे.

या प्रकरणी तहसील कार्यालय संगमनेर (दि. १५ फेब्रुवारी २०२४), प्रांत कार्यालय संगमनेर (दि. २७ जून २०२४), दिवाणी न्यायालय संगमनेर (दि. १० जानेवारी २०२५), जिल्हा न्यायालय (दि. २६ नोव्हेंबर २०२५) तसेच औरंगाबाद खंडपीठ उच्च न्यायालयाने (दि. १३ जुलै २०२६) सामाईक रस्त्यावरील अतिक्रमण हटवून रस्ता पूर्ववत खुला करण्याचे स्पष्ट आदेश दिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मात्र, न्यायालयीन आणि महसूल विभागाच्या आदेशांनंतरही संबंधित रस्ता अद्याप खुला करण्यात आलेला नसल्याने न्यायालयीन आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाने तातडीने आदेशांची अंमलबजावणी करून रस्ता पूर्ववत खुला करावा, अन्यथा उपोषण अधिक तीव्र करण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला आहे.

या मागणीसाठी मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ पासून प्रांत कार्यालय, नवीन नगर रोड, संगमनेर येथे रस्ता खुला होईपर्यंत आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. उपोषणात सौ. मीना भाऊसाहेब पवार, सौ. कांताबाई सूर्यभान पवार, सौ. वर्षा सुनील पवार, अशोक बजाबा पवार, भाऊसाहेब बापू पवार, सूर्यभान लक्ष्मण पवार, बाळकृष्ण पंढरीनाथ पवार, भास्कर बाळकृष्ण पवार, सीताराम देवबा पवार, रतन रावसाहेब पवार आणि हिरा भास्कर पवार सहभागी झाले आहेत.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड I रत्नागिरी I सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165




अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी ♦ योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे ♦ गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे ♦ विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे ♦ गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी ♦ लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग ♦ संभोगात रस न येणे
♦ स्तनांची वाढ न होणे ♦ संभोगा विषयीची भीती
♦ स्तनातून दूध न येणे ♦ हस्तमैथुनाची सवय
♦ स्तनात गाठी ♦ लैंगिक विकृती
♦ स्तनाचा कर्करोग ♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25